बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका

पुणे म्युनिसिपल कार्पोरेशन स्था. १९५० — CORPORATION OF THE CITY OF PUNE * EST. 1950 *

# पुणे महानगरपालिका

## स्ट्रक्चरल इंजिनिअर च्या कामासाठी परवाना

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 31 अन्वये पुणे शहरासाठी दि.5-1-2017 रोजी मान्य झालेल्या विकास बांधकाम नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.6-4, अपेंडिक्स 'सी' अन्वये आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 372 अन्वये स्ट्रक्चरल इंजिनिअर काम करण्यास परवाना देण्यात येत आहे.

परवाना क्र. : 754 A From 14-02-2022 To 31-12-2024 (Structural Engineer)

नाव:- NIKHIL DNYANESHWAR DAWARE
पत्ता:- A/P Rase, Near Z.P. High School, Tal. Khed, Pune-410501

दिनांक : 14/2/2022

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 31 अन्वये पुणे शहरासाठी दि.5-1-2017 रोजी मान्य झालेल्या विकास बांधकाम नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील ( डीसीपीआर -2017 ) नियम क्र.6-4, अपेंडिक्स 'सी' अन्वये आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 372 अन्वये मी तुम्हांस वर निर्देश केलेल्या कायदा व नियमानुसार 3 वर्षांकरिता दि. 14-02-2022 to 31-12-2024 अखेर स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणून 'खालील मर्यादा व अटी यांचे पालन करणार' या या अटीवर परवाना देत आहे.

'मा.महापालिका आयुक्त, यांनी वेळोवेळी स्थायी समितीच्या संमतीने वरील कायद्याचे कलम 373 परवानाधारण करणार यांच्या माहितीसाठी काढण्यात आलेल्या आज्ञांचे आणि विकास (बांधकाम) नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील अपेंडिक्स 'सी' मधील कर्तव्ये व जबाबदारी यांचे पालन करणार' ही परवानगीची अट राहील आणि धंद्याच्या प्रत्येक बाबतीत परवान्याच्या मुदतीत ज्यावेळी तुमचा सल्ला घेण्यात येईल त्यावेळी तुम्ही आतापावेतो निघालेल्या आज्ञांचे पूर्णपणे पालन करून त्याप्रमाणे काम करावयाचे आहे.

ही आज्ञापत्रक वेळोवेळी काढण्यात आली आहेत, ती मुख्य कार्यालयाकडे माहितीसाठी ठेवण्यात आलेली असून, जरूर त्यावेळी कार्यालयाच्या वेळेमध्ये त्यांची पाहणी करता येईल.

मात्र हे लक्षात घेणे जरूर आहे की, मा.महापालिका आयुक्त सदरचा परवाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम 386 अनुसार जरूर तेव्हा तात्पुरता बंद अगर रद्द करुशकतात. जर वर निर्दिष्ट केलेली बंधने अगर शर्ती यांचा भंग झाला अगर टाळल्या गेल्या अथवा तुम्ही सदर कायद्याच्या नियमांचे अगर वेळोवेळी काढण्यात आलेल्या आज्ञापत्रकांचे उल्लंघन केल्याचे दृष्टेपतीस आल्यास आणि जर सदरचा परवाना तात्पुरता तहकुब अगर रद्द झाल्यास अथवा सदरच्या परवान्याची मुदत संपल्यावर तुम्हास परवाना नसल्याचे समजले जाईल आणि महानगरपालिका अधिनियमाचे कलम 69 अन्वये मा.महापालिका आयुक्त, अगर त्यांनी अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यांनी सदर परवान्याची मागणी केल्यास सदरचा परवाना तुम्हांस त्या त्या वेळी हजर करावा लागेल.

महाराष्ट्र शासनाने पुणे शहरासाठी मान्य केलेल्या विकास (बांधकाम) नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार परवाना शुल्क म्हणून रू. 3000/- चलन क्र. CE/BP/31653/21 दि. 4/2/2022 - अन्वये भरले आहे.

कार्य अभियंता, (बांधकाम विकास विभाग)
पुणे महानगरपालिका

शहर अभियंता पुणे
महानगरपालिका

टीप:- प्रस्तुत परवान्याची मुदत दि.31 डिसेंबर रोजी संपते जर पुढील वर्षासाठी त्याचे नुतनीकरण करणे असेल तर यासाठी कमीत कमी 15 दिवस परवाना मुदत संपण्या अगोदर परवाना शुल्कासहीत अर्ज सादर केला पाहिजे. परवान्याचे नुतनीकरण करून घेण्याबद्दल तुम्हांस वेगळी समज दिली जाणार नाही आणि जो पर्यंत परवान्याच्या नुतनीकरणासाठी परवाना शुल्कासहीत अर्ज दिलेला नाही. तोपर्यंत स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणून काम करता येणार नाही. तसेच परवाना नाकारल्यासही तुम्हांस स्ट्रक्चरल इंजिनिअर म्हणून काम करता येणार नाही.